# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ०४.०८.२०२६ मंगळवार**

**नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान—प्रदान कार्यक्रम संपन्न :—**

मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे संकल्पनेतुन दिनांक ०४.०८.२०२६ रोजी, नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण २३ अटक आरोपींचे आदान—प्रदान हे पोलीस मुख्यालय येथील अलंकार सभागृह येथे पार पडले. आदान—प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान—प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार हे आरोपींसह हजर होते.

मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली बाबत उपस्थीत पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजावुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचे डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा सुचना दिल्या.

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची विशेष मोहीम :— ०५ हद्दपार इसमांना अटक.**

गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार यांनी नियंत्रण कक्ष येथील आरसीपी पथक क्र. १ यांचेसह वेगवेगळया ०५ टिम तयार करुन परिमंडळ क्र. १ अंतर्गत पोलीस ठाणे प्रतापनगर व बजाजनगर हद्यीत राहणारे हद्यपार इसमांविरुध्द दिनांक ०४.०७.२०२६ चे ०५.०० वा. ते ०९.०० वा. चे दरम्यान, विशेष तपास मोहीम राबवून हद्यपार इसमांना पंचासमक्ष त्यांचे राहते घरी चेक केले असता, ०८.०० वा. चे सुमारास सुभाषनगर, कामगार कॉलनी येथे राहणारा हद्यपार नामे राहुल धनराज हाथीबेंड वय ३० वर्ष हा विनापरवाना राहते घरी मिळून आला. तसेच  तसेच ०८.१५ वा. सुभाषनगर, संत तुकडोजी नगर येथे राहणारा हद्यपार नामे अंकुश किशोर जमरे वय ३० वर्ष हा विनापरवाना राहते घरी मिळून आला. ०८.३० वा. पोलीस ठाणे प्रतापनगर हद्यीत सुभाषनगर, संत तुकडोजी नगर येथे राहणारा हद्यपार नामे साहील राजेश हाथीबेंड वय २२ वर्ष हा विनापरवाना राहते घरी मिळून आला. ०८.५० वा. सुभाषनगर, संत तुकडोजी नगर येथे राहणारा हद्‌दपार इसम नामे शंकर लेकराम पंचेश्वर वय २९ वर्षे, हा त्याचे घरी विनापरवाना राहताना मिळून आला. तसेच ०८.१५ वा. पोलीस ठाणे

बजाजनगर हद्दीत दंतेश्वरी झोपडपट्टी, ऑरेंज सिटी हॉस्पिटलमागे, बजाजनगर येथे राहणारा हद्दपार इसम नामे अशफाक मुनीर अन्सारी वय २६ वर्ष हा त्याचे घरी विनापरवाना राहतांना मिळून आला.

आरोपी यांना पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेशान्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केले असतानांही आरोपी हे कोणतीही परवानगी न घेता विनापरवाना पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष राहते घरी मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे प्रतापनगर व बजाजनगर येथे आरोपींविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आरोपींना अटक केली आहे. आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव प्रतापनगर व बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे, सपोनि राजाभाऊ जाधव, पोउपनि ओमप्रकाश कोठे, पोहवा. नितीन वासनिक, योगेश वासनिक, मनोज टेकाम, प्रितम यादव, पोअं कुणाल गेडाम, पकंज ठवकर व नियंत्रण कक्ष येथील आरसीपी पथक क्र. १ चे एकूण २८ अंमलदार यांनी संयुक्तीकरित्या केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे प्रतापनगरः— फसवणुक करणाऱ्या अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २९.०७.२०२६ चे ०१.३० ते दिनांक ०१.०८.२०२६ चे २०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत, प्लॉट क्र. ८४ बी, पांडे ले आऊट, खामला रोड, प्रतापनगर येथे राहणारे फिर्यादी नरेश वासुदेव ठाकरे वय ५२ वर्षे यांचे मोबाईलवर त्यांचे मित्राचे मोबाईल फोनवरुन लग्नपत्रिकेची एपीके फाईल आल्याने फिर्यादी यांनी फाईल डाऊनलोड केली असता, फिर्यादीचा फोन हॅक झाला. अज्ञात आरोपीने फिर्यादीचा मोबाईल हॅक करुन एपीके फाईलद्वारे फिर्यादीचे युनियन बॅक ऑफ इंडीयाचे खात्यामधून अप्रामाणिकपणे एकूण ६,१२,२०९ रुपये ऑनलाईन वळते करुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे मपोउपनि. रेश्मा सरगर ७०३०३६२७६० यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४) भा.न्या.सं. सहकलम ६६(क) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे धंतोली :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०३.०८.२०२६ चे ०९.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी शैलेष शामराव वानखेडे वय ४५ वर्षे, रा. प्लॉट क्र. १३, जयभीम नगर, रामेश्वरी रोड, अजनी नागपूर हे त्याचे हिरो होंडा मोटार सायकल क्र. एमएक ३१ व्हीझेड ४९४६ ने पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, धंतोली गार्डन, एमएसईबी ऑफीससमोर चौकातुन कॉंग्रेसनगर

कडे येत असता, ऑटोरिक्षा क्र. एम.एच. ४९ सीएक्स १४८६ चा चालक नामे रक्षक चिंतामण सतिकोसरे वय २५ वर्ष रा. प्लॉट क्र. ९१, वैष्णोदेवी नगर, भांडेवाडी, नागपूर याने त्याचे ताब्यातील ऑटोरिक्षा भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला समोरुन धडक मारल्याने फिर्यादी हे खाली रोडवर पडून गंभीर जखमी झाले. जखमी फिर्यादीस उपचाराकरीता श्रीकृष्ण हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या बयाणावरुन पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. मिरा सोनुने ७२४९२२५८७३ यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं., अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे कोतवाली</u> :—** कु. अलविरा अली जावेद अली वय २० वर्षे रा. नबाबपुरा मस्जिदजवळ, हत्तीनाला, कोतवाली, नागपूर ही दिनांक २८.०७.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ४ इंच, केस—काळे लांब, अंगात—पांढरा शर्ट ज्यावर मिकी माऊसचे पोस्टर व डेनिम जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** कु. नंदीनी रोशनी भिमटे वय १६ वर्षे, रा. चॉक्स कॉलनी, क्वॉर्टर क्र. १००, ललित कलाभवन जवळ, जरीपटका, नागपूर ही दिनांक ०४.०८.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट, केस—काळे, भाषा— मराठी/हिंदी बोलते. ओळखचिन्हे— मानेवर उजवे बाजुला चट्टा आहे.

**<u>३) पोलीस ठाणे कोतवाली</u> :—** कु. संध्या संजयराव गिरीपुंजू वय ३२ वर्षे रा. चिटणवीसपुरा, सोनिया गांधी झोपडपट्टी, कोतवाली, नागपूर ही दिनांक ३१.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे लांब, अंगात—गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा—मराठी बोलते.


कु. अलविरा


कु. नंदीनी


कु. संध्या

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| १. | मा. जिल्हा न्यायाधीश | ४२३/ | कलम ३५४, | दाऊद रशिमुद्दीन मानस वय ४३ | ०६.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | –११ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | २०१३ | ३७६, १०९ भा.दं.वि. सहकलम ३(४),६ ड्रग्ज अ‍ॅक्ट | वर्ष रा. गितानगर, मानेवाडा, ढवळेच्या घरी किरायाने, अजनी, नागपुर | |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**